# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक ०५/०९/२०१७

दिनांक ०५/०९/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमिदाराच्या खबरेवरुन मा. पोलीस अधिक्षक साो. यांच्या आदेशान्वये तसेच मा. पोलीस निरीक्षक स्थागुशा गडचिरोली यांच्या मार्गदर्शनाखाली शासकिय वाहनाने मौजा गडचिरोली, रामनगर येथील आरोपी क्रमांक १) योगेश शामराव चापले, वय-३२ वर्ष, व्यवसाय मजुरी, रा. मेंढाटोल, ता. धानोरा, जि. गडचिरोली हा आरोपी क्रमांक. २) सुनिता साईनाथ सोमनकर, रा. लांजेडा, ता. जि. गडचिरोली येथील विदेशी दारु अवैध रित्या हिला विक्री करीता आणून देणार आहे अशी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाले वरुन धानोरा-गडचिरोली मार्गे सापळा रचून बसलो असता भरधाव वेगाने स्कोडा कंपनीचे वाहन रामनगर वॉर्डाकडे गेली असता तिचा पाठलाग करुन वाहनास थांबवून वाहनाची प्रोव्हीबिशन बाबत झडती घेतली असता वाहनामध्ये मॉकडॉल नं. १ कंपनीचे विदेशी दारुचे बॉक्स मिळून आले सदर मालाची किंमत ४२,६००/- रुपयाचा विदेशी दारुचा माल तसेच दारुवाहतुकी करीता वापरण्यात आलेले चारचाकी स्कोडा कंपनीची ओक्टाव्हिया १.९ टी डी आय वाहन क्रमांक एम एच १२ डी एम ७६३२ किंमत ५,२५,०००/- असा एकूण ५,६७,६००/-रु. चा मुद्देमाल मिळून आला. नमूद दोन्ही आरोपी विरुध्द पोस्टे गडचिरोली येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (अ), ९८ (क), ८३ अन्वये गुन्हा नोंद केला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोस्टे गडचिरोली येथे चालू आहे.

सदरची कारवाई मपोउपनि समु चौधरी, पोहवा/१४६१ नरेश सहारे, पोना/२२५२ उध्दव नरोटे, पोना/३०९२ दुधराम चवारे, मपोशि/१४५२ दुर्गा साखरे, चानापोशि/२९८६ प्रशांत पातकमवार यांनी केली आहे.